महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२७ वे | दिनांक : ०१/०५/२०२६ | वार शुक्रवार

## आमच्यात कसलीही स्पर्धा नाही : आम्ही 'इन्फ्रा फॅमिली' आहोत — मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना महाराष्ट्राच्या विकासावर तसेच येथील पायाभूत सुविधांवर भाष्य केले. तसेच महायुतीमधील अंतर्गत राजकारणावरही त्यांनी भाष्य केले आहे. महाराष्ट्र पुढील ४-५ वर्षात इतका पुढे जाईल, देशात कोणीच स्पर्धा करू शकणार नाही, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच येथील पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने होत असलेल्या श्रेयवादाच्या लढाईवर बोलताना एकनाथ शिंदे यांच्यासोबत कुठलीही स्पर्धा नाही, असेही फडणवीस यांनी सांगितले आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे उद्या, १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लोकार्पण होत आहे. या प्रकल्पावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात श्रेयवादाची लढाई सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र, 'आमच्यात कसलीही स्पर्धा नाही' असे स्पष्ट करत फडणवीस यांनी या वादावर पडदा टाकला आहे. ते म्हणाले, आमची एकनाथ शिंदे यांच्यासोबत कुठलीही स्पर्धा नाही, आम्ही 'इन्फ्रा फॅमिली' मध्ये आहोत. आमच्या सरकारने सुरू केलेले प्रकल्प आमच्याच काळात पूर्ण होत आहेत. आमच्यात श्रेयवादाचे कारण नाही. कार्यकर्त्यांमध्ये सीमित बुद्धी असते, आम्ही इन्फ्रा फॅमिली आहोत, त्यामुळेच आमच्यात कुठलाही श्रेयवाद नाही.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'डॉलर'वर आमचे टार्गेट मागे पुढे होते. आम्ही आमच्या टार्गेटसाठी ऑन ट्रॅक आहोत. पुढील काही वर्षात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था यूएई किंवा सिंगापूर यांना मागे टाकेल. कारण, व्हिजन इन ॲक्शनमध्ये आम्ही आहोत. महाराष्ट्र पुढील ४-५ वर्षात इतका पुढे जाईल, देशात कुणीच स्पर्धा करू शकणार नाही. राज्य सरकारने घेतलेल्या १०० दिवस कार्यक्रमामुळे कामाची क्षमता वाढली आहे. ज्या २० गोष्टींसाठी जनतेला यावं लागते, त्या सेवा आम्ही AI च्या मदतीने सुलभ करू.

मेट्रो ३ मुळे ३५ टक्के ट्रॅफिक कमी झाले. या मेट्रोसाठी विरोध ठाकरेंनी केला, पण सुप्रीम कोर्टानेही योग्य तोडगा काढला, असे फडणवीस यांनी सांगितले. २०३० साली ५२ टक्के ऊर्जा रिन्यूएबल होईल. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, ज्याने एनर्जी प्लॅनिंग केलेय. आपल्या ऊर्जा खात्याला ५२ अवॉर्ड मिळाले असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझे सगळे मंत्री माझे व्हीजन राबवत आहेत. शरद पवारांचे सातत्य हे शिकण्यासारखे आहे. शरद पवारांकडे कठोर निर्णय घेण्याची क्षमता आहे. तसेच मराठी माणूस पंतप्रधान बनेल. पण २०२९, २०३४ किंवा २०३९ कधी बनेल माहीत नाही, असेही फडणवीस यांनी म्हटले.

## मला सुद्धा शिवसेनेकडून उमेदवारीची ऑफर होती : रवी राणा यांचा गौप्यस्फोट



**अमरावती** : महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या एकूण १० जागांसाठी आज राजकीय पक्षांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून, ही निवडणूक आता बिनविरोध होण्याचे निश्चित झाले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ऐनवेळी माजी आमदार बच्चू कडू यांना उमेदवारी जाहीर केल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान, बच्चू कडू यांचे कट्टर प्रतिस्पर्धी मानले जाणारे आमदार रवी राणा यांनी या घडामोडीवर भाष्य करताना एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. विधान परिषदेसाठी शिवसेनेकडून आपल्यालाही उमेदवारीची ऑफर होती, असा दावा राणा यांनी केला आहे.

रवी राणा यांनी बच्चू कडू यांना आमदारकीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच ते म्हणाले, एकनाथ शिंदेंकडून मलाही ऑफर होती. पण मी देवेंद्र फडणवीस यांचा निष्ठावान कार्यकर्ता आहे. शिवसेना वाढीसाठी बच्चू कडू यांना एकनाथ शिंदेंनी पक्षात घेतले, तो त्यांचा पक्षाचा निर्णय आहे. त्यामुळे माझ्या बच्चू कडू यांना शुभेच्छा आहेत. आता सगळ्यांनी एकत्र येऊन महायुतीचा धर्म पाळला पाहिजे, जिल्ह्याचा विकास केला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना रवी राणा म्हणाले, मला सुद्धा काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे, संजय राठोड, आशिष जयस्वाल यांनी सांगितले होते की तुम्ही शिवसेनेसोबत या पण मी त्यांना सांगितले की, मी देवेंद्र फडणवीस यांचा कार्यकर्ता आहे. राजकारणात आहे तोपर्यंत मी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत निष्ठेने राहील. पण, मी महायुतीत तुमच्यासोबत आहे, असेही त्यांनी सांगितले आहे.

शिवसेना वाढवण्यासाठी बच्चू कडू सारखा एक चांगला कार्यकर्ता त्यांना मिळाला आहे. राजकारणात कधीच टोकाची भूमिका नसते, लोकसभेमध्ये नवनीत राणांचा पराभव झाला, त्यामध्ये कोणाचा सिंहाचा वाटा होता ते जनतेला माहित आहे. त्यामुळे जनतेने त्यांचा देखील हिशोब घेतला होता, असेही रवी राणा म्हणाले. तसेच त्यामुळे आता महायुती धर्म पाळून लोकसभा-विधानसभा एकत्र येऊन महायुती धर्म पाळला पाहिजे. मला बच्चू कडूचा माझ्या वाढदिवसा दिवशी फोन आला, त्यादिवशी मी त्यांना त्यांच्या शिवसेनेच्या निर्णयाबाबत शुभेच्छा दिल्या. त्यामुळे राजकीय वैर हे कधी कायम नसते.

## लढायची वेळ आली की कोणाला तरी पुढे करतात : एकनाथ शिंदे



**मुंबई** : महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असून, यावेळी शिंदेंनी उद्धव ठाकरे व कॉंग्रेसवर टीकास्त्र सोडले. लढायची वेळ येते तेव्हा कोणाला तरी पुढे करतात, अशी टीका शिंदे यांनी केली आहे.

तसेच गोरगरीब, शोषित आणि दिव्यांगांच्या हितासाठी शिवसेना सदैव कार्यरत असल्याचे सांगत, त्यांनी बच्चू कडू यांच्या २५ वर्षांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला व त्यांच्या समावेशामुळे शिवसेना आणि कडू या दोघांचीही ताकद वाढेल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. दरम्यान, विधानपरिषदेच्या १० जागांसाठी १०च प्रमुख अर्ज आल्याने ही निवडणूक आता बिनविरोध होण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे.
कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उमेदवार न देण्याचे कारण अंतरआत्म्यातून आवाज आला असे कारण सांगितले. यावर एकनाथ शिंदे यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले, आत्मा हरवलेल्या लोकांच्यातून आवाज येतो का? मी पहिल्यांदा ऐकले आहे, २०१९ ला अंतरआत्मा कुठे होता? आत्मा हरवलेल्या लोकांच्या अंतरआत्म्यतून आवाज येतो का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, खेळीमेळीच्या वातावरणात निवडणूक होत आहे. बिनविरोध निवडणूक होत आहे आणि त्यामुळे सर्व पक्षांचे देखील स्वागत केले पाहिजे. सर्व पक्षांना धन्यवाद दिले पाहिजेत. शिवसेना-भाजप आणि राष्ट्रवादी महायुतीने अधिकचा उमेदवार दिला नाही, त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध आणि खेळीमेळीच्या वातावरणात होत आहे.

उद्धव ठाकरे यांनी अंबादास दानवे यांना उमेदवारी घोषित केली आहे. यावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, लढायची वेळ येते तेव्हा कोणाला तरी पुढे करतात. तुम लढो, हम कपडा संभालते है, हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. मला यावर भाष्य करायचे नाही. सगळ्यांनी समंजसपणाची भूमिका घेतली, कॉंग्रेसने देखील समंजसपणाची भूमिका घेतली त्याबद्दल धन्यवाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ मे २०२६

## इकरा पब्लिक स्कूलतर्फे 'समर वेकेशन होमवर्क बुक'चे प्रकाशन; शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर भर



**जळगाव** : आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात मुले मोबाईलच्या आहारी जात असताना, जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेजने विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत स्तुत्य आणि नाविन्यपूर्ण पाऊल उचलले आहे. शाळेतील अनुभवी शिक्षकांच्या अथक परिश्रमातून आणि कल्पकतेतून तयार करण्यात आलेल्या विशेष 'उन्हाळी सुट्टीतील गृहपाठ पुस्तका'चे प्रकाशन नुकतेच इकरा एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाले.हे पुस्तक केवळ अभ्यासाचे साधन नसून, सर्व विषयांच्या सखोल सरावासाठी जाणीवपूर्वक तयार करण्यात आलेली एक प्रिंटेड पुस्तिका आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध रंजक आणि ज्ञानवर्धक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी डॉ.अब्दुल करीम सालार, एजाज भाई मलिक, अ.अजीज सालार, अ.रशीद शेख, अमीन भाई बदलीवाला,मजीद झकेरिया आणि इरफान सालार या मान्यवरांनी उपस्थित राहून शाळेच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी यावर विशेष भर दिला की, हे गृहपाठ पुस्तक सुट्ट्यांच्या काळात मुलांना मोबाईलच्या स्क्रीनपासून दूर ठेवण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये पुन्हा एकदा 'पुस्तकांशी मैत्री' निर्माण करण्यासाठी एक क्रांतिकारी माध्यम ठरेल. इकरा शाळा केवळ नियमित शैक्षणिक सत्रातच नव्हे, तर सुट्ट्यांमध्येही विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची आणि वेळेच्या सदुपयोगाची काळजी घेते, हे या उपक्रमातून सिद्ध झाले आहे.

या सर्जनशील उपक्रमाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शाळा व्यवस्थापन आणि शिक्षक वृंदाचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

## शेतातून काम करून घरी परतणाऱ्या महिलांना भरधाव कारने चिरडले एकीचा मृत्यू चार जणी जखमी




**दौलताबाद (जावेद अहमद)** : (२९) बुधवार रोजी संध्याकाळी आसेगाव रस्ता ते आसेगाव फाटा रस्त्यावर जण बुधवारी संध्याकाळी सहा वाजे दरम्यान शेतातून शेतीचे काम उरकून घरी परतणाऱ्या महिलांना भरधाव वेगाने आलेल्या कारने चिरळल्याने कविता विक्रम जाधव वय ३५ वर्षे राहणार आसेगाव तालुका गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर हिचा मृत्यू झाला तर रोहिणी सागर सोत्रे होय २५ वर्ष, हिरा रमेश कांबळे, वय ४५ वर्षे, सरला नवनाथ सोत्रे, ३६ वर्षे, सरला एकनाथ सोत्रे, वय ३७ वर्ष,सर्व राहणार आसेगाव,ता.गंगापूर,जि. छत्रपती संभाजी नगर हे जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार सर्व महिला या गावाजवळ सकाळी शेतात काम साठी गेले होते काम करून संध्याकाळी सहा वाजता घरी जात असताना कार चालक सुमित थोरात हा आसेगाव येथून आय २० कार क्र.एम.एच,१२ पी.एच, ८४३९ घेऊन आसेगाव फाट्याकडे भरधाव वेगाने जात असताना त्याचा कार वरील नियंत्रण सुटले रस्त्याच्या कडे उभ्या असलेल्या चारही महिलांना चिरडले अपघातात जखमी झालेल्या महिलांना सागर सोत्रे व ग्रामस्थांनी जगद्गुरु रामानंदचार्य नरेंद्रचार्य संस्थांच्या रुग्णवाहिकेत टाकून छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून कविता जाधव यांना मृत घोषित केले दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये नोंद घेऊन दादा पोलीस पुढील तपास करत आहे. यातील कारचालक हा फरार झालेला आहे.

## टाकळी, टाकळीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीत गणेश कजबे सरपंचपदी विजयी



**दौलताबाद (जावेद अहमद)** : टाकळी, टाकळीवाडी (ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) : ग्रुप ग्रामपंचायतीच्या पोट-निवडणुकीचा निकाल दि. २९ बुधवारी रोजी जाहीर झाला असून, अनुसूचित जाती राखीव थेट जनतेतून सरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत गणेश अंबादास कजबे यांनी १११ मतांनी विजय मिळवला. त्यांनी प्रतिस्पर्धी अमोल काशिनाथ थोरात यांचा पराभव करत सरपंच पद पटकावले.या पोटनिवडणुकीत दोन सदस्य व एक सरपंच पदासाठी मतदान झाले होते. टाकळीवाडी प्रभाग क्रमांक ३ मधून चरण हरसिंग जारवाल हे सदस्य बिनविरोध निवडून आले. तर प्रभाग क्रमांक २ (टाकळी) मधील अटीतटीच्या लढतीत भगवान भाऊलाल बढेकर यांनी केवळ दोन मतांनी विजय मिळवत प्रकाश संताराम चंदेल यांचा पराभव केला.सरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत गणेश कजबे यांना ६०२ मते मिळाली, तर अमोल थोरात यांना ४९१ व भागिनाथ आसाराम काळे यांना १३१ मते मिळाली.दरम्यान, प्रभाग क्रमांक ३ (टाकळीवाडी) येथील सदस्याच्या निधनामुळे तर प्रभाग क्रमांक १ (टाकळी) येथील सदस्य व सरपंच पद अतिक्रमण प्रकरणामुळे रिक्त झाल्याने ही पोटनिवडणूक घेण्यात आली होती.विजयानंतर गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. विजयी उमेदवारांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी कॉम्रेड राम बाहेती, माजी सरपंच तथा सोसायटीचे चेअरमन अभय टाकसाळ, शिवाजीराव चंदेल, लक्ष्मण चंदेल,जनार्दन गवळी, पांडुरंग चंदेल, सुधाकर ठाले, शुभम मोहरे पाटील, सुभाष कजबे, संतोष मोरे, रायभान मोटे, सोमीनाथ भवर शेखनाथ साबळे, अंबादास बनगे पाटील, ज्ञानेश्वर बनगे पाटील,आदी उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ मे २०२६


## छत्रपती संभाजीनगरमध्ये १२० अतिक्रमणे जमीनदोस्त



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेने (मनपा) शहरातील अतिक्रमणांविरोधात धडक मोहीम तीव्र केली आहे. सलग दुसऱ्या दिवशीही मनपाच्या पथकाने शहरात कारवाई करत १२० अतिक्रमणे जमीनदोस्त केली. बुधवारी १४० अतिक्रमणे हटवण्यात आली होती. ही कारवाई वाढत्या अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी आणि वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी करण्यात येत आहे.

आजची कारवाई प्रामुख्याने शहानूर मियां दर्गा परिसरापासून ते भाजीवाली बाई पुतळ्यापर्यंत राबवण्यात आली. यानंतर ही मोहीम आनंद गाढे चौकापर्यंत पुढे नेण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. रस्त्यावर अनधिकृतपणे थाटण्यात आलेले फळविक्रेत्यांचे गाडे, शेड आणि चायनीज सेंटर्स या कारवाईत पूर्णपणे हटवण्यात आले. यामुळे रस्त्यावरील अडथळे दूर होऊन वाहतुकीसाठी रस्ता मोकळा झाला आहे.

शहानूर मियां दर्गा परिसरात या कारवाईला काही स्थानिक आणि व्यावसायिकांनी विरोध केला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र प्रशासनाने परिस्थितीवर नियंत्रण मिळवत कारवाई पूर्ण केली. मनपा उपआयुक्त संतोष वाहूळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेत १२० अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.

अतिक्रमण विभागाच्या उपायुक्त सविता सोनवणे आणि त्यांच्या पथकाने रस्त्यावरील हे अनधिकृत अडथळे हटवून शहर मोकळे श्वास घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली आहेत. यापुढेही रस्त्यावरील अतिक्रमणांवर अशीच कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा मनपाकडून देण्यात आला आहे.

## अब्दिमंडीच्या डोंगराला लागली आग, लाखमोलाची वनस्पती खाक तर अनेक वन्यजीव सरपटणारे प्राणी जळून खाक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबादच्या उत्तर बाजूला मोमबत्ता तलावाच्या वर असलेल्या अब्दिमंडी येथील डोंगराला दि ३० गुरुवारी दुपारच्या सुमारास अचानक आग लागली यामुळे लाखमोलाचे वनस्पती जळून झाली सुदैवाने जीवित हानी टळली. गुरुवारी दुपारच्या सुमारास अब्दिमंडी येथील डोंगरावर अज्ञात व्यक्तीने जळती विडी किंवा सिगारेट टाकल्याने आग लागली असावी पाहता पाहता आगीने उग्र रूप धारण केले या आगीमुळे लाख मोलाचे वनस्पती,तसेच सरपटणारे प्राणी वन्यजीव चिमण्यांची घरटी जळून खाक झाली वनपरिक्षेत्र अधिकारी खुलताबाद निखिल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, वनपाल सुधीर धवन,वन रक्षक पुरुषोत्तम वायाळ,मयूर चौधरी,प्रभुदास हजारे,विनायते,विजय चौहान हे आग आटोक्यात आणण्यासाठी भर उन्हात काम करत होते जोरदार वारा सुटल्याने काही ठिकाणी डोंगराच्या कपारी,वाळलेली मोठी झाडे यामुळे आग विजवण्यासाठी अडथळे येत होते मागील महिन्यात याच डोंगरावर पूर्व भागात २९ मार्च ला आग लागली होती ती रात्री अडीच वाजेपर्यंत आग आटोक्यात आणली होतीसुधीर धवन यांनी सांगितले की खुलताबाद वनपरिक्षेत्र अंतर्गत आग विझविण्यासाठी दहा ते बारा ब्लोअर मशीन उपलब्ध आहे त्या मशीन चे वजन दहा ते पंधरा किलो पर्यंत असते ती खांद्यावर घेऊन जावे लागते पण डोंगराच्या कपारीत पोहचणे अशक्य होते. माणसाला तिथपर्यंत पोहचणे अशक्य होते म्हणून झाडाच्या फांद्या ने आग विझवली जाते. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत आम्ही आग आटोक्यात आणली आहे.

## फडणवीसांचे ऐकून गुवाहटीला गेले, आता शिंदेंचे ऐकून गेले; बच्चू कडूंवर दानवेंचा टोला



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज आज भरला. त्यानंतर माध्यमांना त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच महाविकास आघाडीच्या वतीने मला उमेदवारी देण्यात आली असल्याचे दानवे यांनी सांगितले.

अंबादास दानवे म्हणाले, सर्व पक्षांच्या एक मताने माझा फॉर्म भरला. निवडणूक बिनविरोध होईल असे वाटत आहे. नाराजी नाही, आमची आघाडी आहे. काही गोष्टींची स्पष्टता येणे कॉंग्रेसची भूमिका होती, असेही दानवे यांनी म्हटले. यावेळी बोलताना दानवे यांनी बच्चू कडू यांच्यावर टीका करत म्हटले की, राजकारणात मिनिटा मिनिटाला गणिते बदलत असतात. बच्चू कडू यांना गुवाहटीला जाऊन ४ वर्षे झाली आहेत, तेव्हा फडणवीस यांनी सांगितले म्हणून गेले. आता ते शिंदेंचे ऐकून गेलेत, असा टोला दानवे यांनी लगावला आहे.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते, कॉंग्रेसचे प्रभारी, प्रदेशाध्यक्ष यांची उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा झाली आहे. त्यांनी आम्हाला सूचना दिली आहे, त्याप्रमाणे आम्ही काम करत असल्याची भूमिका कॉंग्रेसने मांडली आहे. प्रदेशाध्यक्ष आणि चेन्निथला यांच्यात लवकरच या संदभात बैठक होईल. तसेच पाच सहा वर्षांपूर्वी नारायण राणे यांनी आपला पक्ष भाजपमध्ये विलीन केला, तसा बच्चू कडु यांनी केला असेल, असेही दानवे म्हणाले.

दरम्यान, आगामी राज्यसभा आणि विधान परिषदेच्या दोन जागांपैकी एका जागेवर दावा करण्याच्या कॉंग्रेसच्या अटीला उद्धव ठाकरेंनी मंजुरी दिल्यानंतरच कॉंग्रेसने अंबादास दानवेंना पाठिंबा दिल्याचे सूत्रांकडून समजते. या राजकीय करारानुसार विधान परिषदेची एक जागा ठाकरे गटाला मिळणार असल्याचे निश्चित झाले असले, तरी कॉंग्रेसने राज्यसभेच्या जागेवर केलेल्या दाव्यामुळे खासदार संजय राउत यांच्या फेरनिवडीत तांत्रिक अडचण किंवा पेच निर्माण होण्याची शक्यता आता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ मे २०२६

# गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान

**वै**शाख महिन्यातील पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत अत्यंत पवित्र, चिंतनशील आणि मूल्यप्रधान मानला जातो. याच दिवशी मानवजातीला करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीनही महत्त्वपूर्ण प्रसंग घडल्याची परंपरा आहे. त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुज्जीवन करणारा, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत, जिथे माणूस भौतिक प्रगतीच्या मागे धावताना मानसिक शांतता, नैतिकता आणि सामाजिक समतेपासून दूर जात आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान अधिकच सुसंगत आणि आवश्यक ठरते.गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व सहाव्या शतकात लुंबिनी येथे शाक्यकुलात झाला. त्यांचे बालनाव सिद्धार्थ होते. राजघराण्यातील ऐश्वर्यपूर्ण वातावरणात त्यांचे बालपण गेले, परंतु त्यांच्या संवेदनशील मनाला जीवनातील दु:खाचे वास्तव सतत अस्वस्थ करत होते. वृद्धत्व, रोग आणि मृत्यू या अपरिहार्य सत्यांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनात जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. "जीवन दु:खमय का आहे?" आणि "या दु:खातून मुक्तीचा मार्ग कोणता?" या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलेली एक महान साधना होती.ज्ञानाच्या शोधात त्यांनी विविध गुरूंकडून शिक्षण घेतले, कठोर तपश्चर्या केली, परंतु त्यांना अपेक्षित समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी अतिभोग आणि अतितप या दोन्ही टोकांच्या मार्गांचा त्याग करून 'मध्यम मार्ग' स्वीकारला. बोधीवृक्षाखाली गहन ध्यानसाधना करून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' म्हणजेच 'जागृत' झाले. या ज्ञानप्राप्तीने त्यांनी मानवी जीवनाचे सत्य उलगडले आणि दु:खातून मुक्तीचा मार्ग दाखवला.बुद्धांचे तत्त्वज्ञान मूलत: मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अनुभव, विवेक आणि आचरण यांना महत्त्व दिले. त्यांच्या शिकवणीत मनुष्य स्वत:च्या कर्माचा निर्माता आहे आणि त्याच्या कृतींवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, ही स्पष्ट भूमिका दिसते. हा दृष्टिकोन माणसाला स्वावलंबन, जबाबदारी आणि नैतिकतेची जाणीव करून देतो.गौतम बुद्धांनी मांडलेली 'चार आर्य सत्ये' ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत आधाररचना आहे. जीवनात दु:ख आहे, दु:खाचे कारण आहे, दु:खाचा अंत शक्य आहे आणि त्या अंताचा मार्ग आहेत ही चार सत्ये ती मानवी जीवनाचे वास्तव स्पष्ट करतात. बुद्धांनी दु:खाचे मूळ 'तृष्णा' किंवा अनियंत्रित इच्छांमध्ये पाहिले आहे. ही तृष्णा माणसाला सतत असमाधानी ठेवते आणि दु:खाचे कारण बनते. म्हणूनच तृष्णेवर नियंत्रण मिळवणे आणि मनाला संतुलित ठेवणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे.या दु:खातून मुक्त होण्यासाठी त्यांनी 'अष्टांगिक मार्ग' सांगितला आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या आठ घटकांचा समावेश असलेला हा मार्ग व्यक्तीला नैतिकता, मानसिक शुद्धता आणि प्रज्ञेच्या दिशेने नेतो. हा मार्ग केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी नसून तो दैनंदिन जीवनातही अत्यंत उपयुक्त आहे. या मार्गाचा अवलंब केल्यास व्यक्तीच्या विचारांमध्ये स्पष्टता, वर्तनात संतुलन आणि जीवनात समाधान निर्माण होते.बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान सामाजिक समतेवर आधारित आहे. त्यांनी जात-पात, वर्णभेद आणि सामाजिक विषमता यांचा ठामपणे विरोध केला. त्यांच्या मते, माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर अवलंबून असते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता आणि आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींना दिशा देतो. त्यांनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा मूलमंत्र दिला, जो सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो.स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी भिक्षुणी संघाची स्थापना करून स्त्रियांना धर्ममार्गावर समान स्थान दिले. त्या काळात स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जात असताना बुद्धांनी त्यांना समानतेची संधी उपलब्ध करून दिली. हा निर्णय केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता.बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री, सत्य आणि क्षमा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी कार्य करणे. 'करुणा' हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक जीवामध्ये समानतेने पाहणे आणि त्याच्याशी सहानुभूतीने वागणे हीच खरी मानवता आहे.आजच्या आधुनिक युगात माणूस भौतिक प्रगतीच्या शर्यतीत इतका गुंतला आहे की त्याने मानसिक शांतता आणि नैतिक मूल्ये गमावली आहेत. ताणतणाव, नैराश्य, असंतोष आणि स्पर्धा यामुळे मानवी जीवन अधिकच क्लिष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे 'मध्यम मार्ग' आणि 'संतुलित जीवन' यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी सांगितलेला मार्ग संयम, सजगता आणि संतुलन यांचा आहे, जो व्यक्तीला अंत:शांती आणि समाधान देतो.पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे ही त्यांच्या शिकवणीची एक महत्त्वाची बाजू आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त ठरतो.बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही स्पर्श करणारे आहे. त्यांनी मानवी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण यांविरुद्ध एक सुस्पष्ट आणि विवेकी भूमिका मांडली. त्यांच्या विचारांत माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि समानतेचा आग्रह दिसतो. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक चौकटीत न बसता व्यापक अर्थाने मानवतावादी आणि समाजपरिवर्तनवादी ठरते. त्यांच्या शिकवणीत कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा रूढीपरंपरांना स्थान नाही. त्यांनी तर्क, विवेक आणि अनुभव यांच्या आधारे जीवन जगण्याचा संदेश दिला.आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या मूल्यांशीही बुद्धांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानात स्पष्टपणे दिसून येतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, तिच्या सन्मानाचे रक्षण व्हावे आणि ती स्वाभिमानाने जगू शकेल अशी व्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आजच्या काळात वाढती सामाजिक दरी, आर्थिक विषमता आणि अन्यायाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांचे विचार समाजाला अधिक न्याय्य आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.शिक्षणाच्या क्षेत्रातही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी ज्ञानाला केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता त्याचा उपयोग जीवन समजून घेण्यासाठी आणि आत्मविकासासाठी करावा, असा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. "स्वत:च्या अनुभवातून सत्य जाणून घ्या" ही त्यांची भूमिका आजच्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी असावे, ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.बुद्धांचे तत्त्वज्ञान मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या युगात तणाव, नैराश्य, चिंता आणि अस्थिरता या समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत 'सम्यक स्मृती' आणि 'सम्यक समाधी' या संकल्पना अत्यंत प्रभावी ठरतात. सजगता (माइंडफुलनेस) आणि ध्यानसाधना यामुळे मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि व्यक्तीला आत्मिक समाधान मिळते. त्यामुळेच आजच्या आधुनिक मानसशास्त्रातही बुद्धांच्या ध्यानपद्धतीला विशेष महत्त्व दिले जाते.पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी सर्व जीवसृष्टीबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे, संसाधनांचा मर्यादित आणि जबाबदारीने वापर करणे आणि सर्व जीवांचे संरक्षण करणे ही त्यांची शिकवण आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरते. मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची गरज त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे.बुद्धांचे तत्त्वज्ञान जागतिक स्तरावरही प्रभावी ठरले आहे. आशियातील अनेक देशांनी त्यांच्या शिकवणीचा स्वीकार करून आपली सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था घडवली आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता आणि साधेपणा यामुळे ते सर्व स्तरांतील लोकांना समजण्यास आणि आचरणात आणण्यास सोपे वाटतात. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे एका विशिष्ट धर्मापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मानवजातीसाठी उपयुक्त ठरते.आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, विचारप्रवाह आणि जीवनशैली एकत्र येत आहेत, तिथे सहिष्णुता, संवाद आणि परस्पर आदर या मूल्यांची आवश्यकता अधिकच वाढली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या सर्व मूल्यांना प्रोत्साहन देते. त्यांनी द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा आणि स्वार्थाऐवजी परोपकार यांचा पुरस्कार केला. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे जागतिक शांतता आणि सौहार्द निर्माण होण्यास मदत होऊ शकते.गौतम बुद्धांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ भूतकाळातील एक ऐतिहासिक घटना नसून ते आजच्या आणि भविष्यातील समाजासाठीही मार्गदर्शक आहे. त्यांच्या शिकवणीतून आपण केवळ वैयक्तिक जीवनातील समस्या सोडवू शकत नाही, तर समाजातील व्यापक प्रश्नांनाही सामोरे जाऊ शकतो. त्यांनी दिलेला 'मध्यम मार्ग' हा अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे, जो आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे.वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसा या मूल्यांचा अंगीकार केल्यास आपण अधिक शांत, सुसंवादी आणि न्याय्य समाज निर्माण करू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनात आणि विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यासच खऱ्या अर्थाने बुद्धांचे तत्त्वज्ञान साकार होईल.आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताण, नैतिक अध:पतन, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय संकट. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ बाह्य उपाय पुरेसे नाहीत, तर अंतर्मुख होऊन स्वत:च्या विचारांमध्ये आणि वर्तनात बदल घडवणे आवश्यक आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या परिवर्तनासाठी एक प्रभावी मार्ग दाखवते. त्यांच्या शिकवणीतून आपण संयम, सजगता, सहानुभूती आणि विवेक या गुणांचा विकास करू शकतो.शेवटी असे म्हणता येईल की गौतम बुद्ध यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वारसा आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता, साधेपणा आणि उपयुक्तता यामुळे ते काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत. वैशाख पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी आपण त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या या मार्गावर चालत आपण अधिक सुंदर, शांततापूर्ण आणि न्याय्य जग निर्माण करू शकतो—हीच या दिनाची खरी शिकवण आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्र, पाली आणि बौद्ध धम्माचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ मे २०२६


## माझा महाराष्ट्र

माझा महाराष्ट्र
साधू संतांची पावन भूमी
विठ्ठचे नाम जपता
पडेल आम्हा काय कमी
जिने घडविला शूरशिवाजी
अशी माता जिजाबाई
गाथा लिहितांना शौर्याची
कमी पडेल शाई
भिन्न आमचे धर्म
भिन्न आमच्या जाती
सदा जपतो आम्ही
एकतेची नाती
तन-मनाला समृद्ध करी
तुकोबाची अभंगवाणी
कोकिळेवाणी गुंजती
लतादिदिची मंजूळ गाणी
माझ्या महाराष्ट्राचा
वाटतो आम्हा अभिमाण
मराठी भाषा ऐकूनी
तृप्त होतात काण



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# माणसं जोडणारा माणूस : श्रीकांत चौगुले



उत्तम शिक्षक, प्रभावी पर्यवेक्षक, प्रशासनकुशल मुख्याध्यापक, यशस्वी लेखक, ख्यातनाम निवेदक, मुलाखतकार, विविध विषयात पदव्युत्तर पदव्या मिळवलेले व्यासंगी व्यक्तिमत्व श्री. श्रीकांत पांडुरंग चौगुले हे काल दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी दैनंदिन अध्यापनाबरोबरच बालचित्रवाणी, बालभारती, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, जीवन शिक्षण, अक्षरभारती, बालकुमार साहित्य संस्था आदी महत्त्वाच्या शैक्षणिक, साहित्यिक संस्थांमध्ये अत्यंत उत्साहाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांच्या वैविध्यपूर्ण कार्याचा आढावा बालसाहित्यिक डॉ. विनोद सिनकर यांनी या लेखात घेतला आहे.

**पा**ठ्यपुस्तकातील कवी, लेखकांबद्दल अधिक माहिती मिळवून ती विद्यार्थ्यांना सांगितल्याने विद्यार्थ्यांना त्या पाठाबद्दल, कवितेबद्दल विशेष कुतूहल आणि जवळीक वाटते असा माझा अनुभव आहे. त्यामुळे लेखकांविषयी अधिक माहिती मिळवण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत असतो. इयत्ता सातवीचं बालभारती मराठीचं पाठ्यपुस्तक २००८ पासून नवीन आलं होतं; तेंव्हा त्यातला 'शोध स्वतःचा' हा पाठ शिकवताना श्रीकांत चौगुले या लेखकाच्या नावाची ओळख झाली. जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ, लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांची मुलाखत असलेला हा पाठ अप्रतिम होता. त्यामुळे तो शिकवतानाही एक वेगळा आनंद असायचा. 'शोध स्वतःचा' हा पाठ मुलाखतीचा असल्याने पाठात मुलाखतकाराचा फक्त नामोल्लेख होता. पाठ अत्यंत प्रेरक आणि उद्बोधक होता. मुलाखत म्हणजे काय, मुलाखत घेताना प्रश्न कसे विचारावेत याबाबतचे योग्य मार्गदर्शन करणारा हा पाठ होता. मात्र मुलाखतकार लेखकाबद्दल नावाशिवाय दुसरी काही माहिती मिळाली नव्हती. योगायोगाने दुसऱ्याच वर्षी पुण्यात श्रीकांत चौगुले यांची भेट झाली. ते शिक्षक आहे ते कळलं, गप्पा झाल्या आणि या भेटीचं मैत्रीत रूपांतर कधी झालं हे कळलंच नाही. श्रीकांत चौगुले हे एक उत्तम शिक्षक आहेत, उत्तम निवेदक, मुलाखतकार, आहेत.

विविध विषयात पदव्युत्तर पदव्या मिळवलेले व्यसंगी व्यक्तिमत्व आहेत अशी त्यांची ओळख हळूहळू होऊ लागली. पुढे तर इयत्ता चौथी आणि आठवीच्या मराठी बालभारती स्वाध्यायपुस्तिका लेखक-संपादक मंडळात आम्ही सोबतच काम केले, त्यामुळे नियमित भेटी आणि संवादातून मैत्री अधिक घट्ट होत गेली. श्रीकांत चौगुले हे पुण्यातील प्रथित यश निवेदक, लेखक असूनही एक अत्यंत साधे निगर्वी व्यक्तिमत्व आहेत याचा अनुभव आला. वेळोवेळीच्या भेटीतून त्यांच्या लेखनाबद्दल कळत असे, तेव्हा ती अद्ययावत माहिती पाठ शिकवताना मला समाविष्ट करून घेता येत असे. याचा मला आणि माझ्या विद्यार्थ्यांना मिळणारा आनंद वेगळा असे. 'श्रीकांत चौगुले हा माणसं जोडणारा माणूस आहे', हे प्रकर्षाने जाणवलं. 'शिक्षणाच्या वाटेवर ' ह्या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजा दीक्षित, डॉ. न .म .जोशी, पद्मश्री गिरीश प्रभुणे, आळंदी देवस्थानचे माजी मुख्य विश्वस्त सु .वा .जोशी यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी उपस्थितांमध्ये सुमारे 100 मान्यवर असे होते, की त्यातील प्रत्येक व्यक्ती ही एखाद्या मोठ्या कार्यक्रमाचा प्रमुख पाहुणा असावी. साहित्यिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांसह शेकडो व्यक्तींच्या मनात श्रीकांत चौगुले यांनी आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. ज्ञानमित्र माधव राजगुरू षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्तच्या 'माझा मराठीचा बोलु कौतुके ' या ग्रंथाच्या संदर्भात आणि गौरव सोहळ्यानिमित्त पुढेही चौगुले सरांना अनेकदा भेटलो. त्यातून त्यांच्याबद्दलची माहिती मिळत गेली. अत्यंत खडतर परिस्थितीतून शिक्षण घेऊन पुढे पुण्यनगरीत आल्यावर शिक्षणक्षेत्रात चौगुले सरांना मोठा नावलौकिक लाभला. असे एक बहुआयामी व्यक्तिमत्व श्रीकांत पांडुरंग चौगुले सर शिक्षण क्षेत्रातील शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार दि. 30 एप्रिल २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा मांडण्यासाठी केलेला हा लेखन प्रपंच! पिंपरी चिंचवड मनपा शाळेत 35 वर्षे शिक्षक म्हणून सेवा करताना काही वर्षे मुख्याध्यापक आणि काही वर्षे मनपा 'प्रभाग ग -पर्यवेक्षक' म्हणूनदेखील चौगुले सरांनी उत्तम कार्य केले आहे.आपली अध्यापन सेवा उत्तमरीत्या पार पाडत असताना श्रीकांत चौगुले यांनी स्वतःतला लेखक, निवेदक, मुलाखतकार आणि व्यासंगी शिक्षक सतत जागृत ठेवला. उत्तम आवाजाची देणगी लाभलेल्या श्रीकांत चौगुले यांची निवेदनशैली रसाळ, मधुर आणि लालीत्यपूर्ण असल्याने त्यांच्या हाती सूत्रे असलेल्या कार्यक्रमात श्रोते, रसिक, प्रेक्षकांनी मंत्रमुग्ध होण्याचा अनुभव विशेषतः पिंपरी चिंचवड आणि पुणेकरांनी घेतला आहे. मा. बाळासाहेब ठाकरे, शरदचंद्रजी पवार यांच्यासह मुख्यमंत्री, राज्यपाल असे मान्यवर प्रमुख अतिथी असलेल्या अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन त्यांनी उत्तमरीत्या केले आहे. 'विठ्ठलभक्ती' या भक्तीगीतांच्या कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदनही त्यांनी केले आहे. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'कलारंग' कार्यक्रमात त्यांनी अनेक मान्यवरांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. वेगवेगळ्या निमित्ताने डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, दिलीप प्रभावळकर, जब्बार पटेल, पद्मश्री अण्णा हजारे, प्राचार्य शिवाजीराव भोसले, डॉ. विठ्ठल वाघ, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. अरुणा ढेरे, तेजश्री प्रधान, तेजस्विनी पंडित, सुकन्या कुलकर्णी, हेमंत ढोमे, विजय कदम,अंकुश चौधरी यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या प्रकट मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत. खास महिलांसाठी असलेल्या 'गाणी,गप्पा, खेळ आणि ऑर्केस्ट्रा'सह कार्यक्रमाची संकल्पना, निर्मिती श्रीकांत चौगुले यांचीच, त्याचे आजवर महाराष्ट्रात पाचशे प्रयोग सादर झाले आहेत. लेखक श्रीकांत चौगुले यांचीविविध विषयांवरील नऊ पुस्तके प्रकाशित आहेत. दै.सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत यांसह अनेक वृत्तपत्रातून तसेच दिवाळी अंक, विविध मासिकातून त्यांनी सातत्याने लेखन केले आहे. बालभारती, बालचित्रवाणी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या संस्थांमध्ये अनेक वर्षे लेखक, संपादक, समीक्षक, तज्ज्ञ मार्गदर्शक, प्रशिक्षक अशा विविध भूमिकातून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. अनेक संस्थांमध्ये त्यांनी अध्यक्ष, कार्यवाह या महत्त्वाच्या पदांसह विविध पदांवर असताना पदाला योग्य न्याय देत कार्य करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे, करत आहेत. अध्यापन सेवेत साडेतीन दशके कार्यरत असताना श्रीकांत चौगुले यांनी वैविध्यपूर्ण कार्यातून शिक्षण क्षेत्रावर आपला अमिट ठसा उमटवला आहे. असे संपन्न व्यक्तिमत्व आमचे मित्र असल्याचा सार्थ आनंद आणि अभिमान वाटतो. या कार्यबाहुल्यात काही छंद, ठरविलेल्या महत्त्वाच्या गोष्टी, पर्यटनानंद याला पुरेसा वेळ देता आलेला नसतो, तो सेवानिवृत्तीमुळे त्यांना यापुढे मिळेल आणि त्या वेळेचे उत्तम नियोजनही त्यांनी तयार करून ठेवले असेल याची खात्री आहे. चौगुले सरांची अशी प्रतीक्षित महत्वपूर्ण कामे पूर्णत्वास जावोत. त्यांच्या इच्छा पूर्ण होवोत, त्यांना उदंड दीर्घायुरारोग्य लाभो! अनंतकोटी हार्दिक शुभेच्छा!


**- डॉ. विनोद पांडुरंग सिनकर**
बालसाहित्यिक, शिक्षक,
छत्रपती संभाजीनगर.
भ्र. 7588736326 / 8999579066



जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ मे २०२६


# श्रमिकांचे जग : संघटित-असंघटित दरीत हरवलेले हक्क

१ मे आंतरराष्ट्रीय श्रमिक हा दिवस जगभरातील श्रमिकांच्या संघर्षाचा, हक्कांच्या लढ्याचा आणि सामाजिक न्यायाच्या आकांक्षेचा प्रतीक आहे. परंतु या दिवसाचे खरे महत्त्व तेव्हाच अधोरेखित होते, जेव्हा आपण “श्रमिक” या संज्ञेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहतो. संघटित क्षेत्रातील सुरक्षित नोकऱ्या आणि असंघटित क्षेत्रातील असुरक्षित जगणे यामधील दरी केवळ भारतापुरती मर्यादित नाही; ती जागतिक पातळीवर दिसणारी एक मूलभूत विषमता आहे. जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) च्या अहवालांनुसार, जगातील सुमारे ६० टक्के कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. या कामगारांना स्थिर वेतन, सामाजिक सुरक्षा किंवा कायदेशीर संरक्षणाची हमी नसते. आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिका या प्रदेशांमध्ये ही परिस्थिती अधिक तीव्र आहे. भारतातील चित्रही याला अपवाद नाही; उलट कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमुळे येथे असंघटित श्रमिकांची संख्या अधिक आहे. जगभरातील कामगारांच्या हक्कांची आठवण करून देणारा, त्यांच्या संघर्षांचा सन्मान करणारा आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला नवी धार देणारा दिवस आहे. परंतु या दिवशी एक मूलभूत प्रश्न पुन्हा अधोरेखित होतो, भारतातील शेतमजूरांना खऱ्या अर्थाने “कामगार” म्हणून मान्यता मिळाली आहे का? की ते अजूनही आपल्या धोरणात्मक चौकटीच्या काठावरच उभे आहेत?

भारतातील कृषीव्यवस्था ही श्रमप्रधान आहे आणि तिचा कणा म्हणजे शेतमजूर. बी पेरण्यापासून कापणीपर्यंत, नांगरणीपासून मळणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतमजूरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. तरीही त्यांच्या श्रमाला औद्योगिक कामगारांप्रमाणे औपचारिक ओळख मिळालेली नाही. ‘कामगार’ म्हटले की कारखान्यातील मजूर, बांधकाम कामगार किंवा सेवा क्षेत्रातील कर्मचारी सहज डोळ्यासमोर येतात; परंतु उन्हातान्हात, पावसात काम करणारा शेतमजूर मात्र या चौकटीत बसत नाही. हीच विसंगती आपल्या श्रमव्यवस्थेतील मोठी उणीव आहे. कृषी क्षेत्र हे सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र आहे. पण या क्षेत्रात काम करणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांचे वास्तव अत्यंत गुंतागुंतीचे आहे. जमीन नसल्यामुळे ते मजुरीवर अवलंबून असतात. शेतीचे हंगामी स्वरूप त्यांच्या रोजगाराला अस्थिर बनवते. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीमुळे त्यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार होतात. जागतिक स्तरावरही अशीच परिस्थिती दिसते. भारतामध्ये किमान वेतन कायदा १९४८ आणि असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ यांसारखे कायदे अस्तित्वात असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी अजूनही आव्हानात्मक आहे. जागतिक स्तरावर अनेक देशांनी कृषी कामगारांसाठी विशेष कायदे आणि सामाजिक सुरक्षा प्रणाली विकसित केल्या आहेत. उदाहरणार्थ, युरोपमधील काही देशांमध्ये शेतमजुरांना आरोग्य विमा, बेरोजगारी भत्ता आणि निवृत्तीवेतनाची सुविधा उपलब्ध आहे. त्याच्या तुलनेत भारतातील शेतमजूर अजूनही मूलभूत सुरक्षेपासून वंचित आहेत. तसेच अनेकांचे घ,रे बंगले, इमारती बनविणारे इमारत कामगार, वीटभट्टी कामगारांचा प्रश्न हा केवळ भारतापुरता मर्यादित नाही. दक्षिण आशिया, विशेषतः भारत, पाकिस्तान आणि नेपाळमध्ये वीटभट्टी उद्योगात काम करणारे मजूर मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित असतात. कर्जाच्या बदल्यात काम करणे, दीर्घ कामाचे तास, बालमजुरी आणि आरोग्याच्या समस्या हे त्यांच्या आयुष्याचे वैशिष्ट्य आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने अशा परिस्थितीला “आधुनिक गुलामगिरीचे रूप” असे संबोधले आहे. महिला श्रमिकांचा प्रश्न जागतिक स्तरावर अधिकच गंभीर आहे. कृषी क्षेत्रात महिलांचे योगदान मोठे असले तरी त्यांना कमी वेतन, कमी मान्यता आणि अधिक श्रम यांचा सामना करावा लागतो. भारतातही महिला शेतमजूर दुहेरी ओझे उचलतात. शेतीकाम आणि घरगुती जबाबदाऱ्या पार पाडतात. जागतिक अहवालांनुसार, महिलांना समान कामासाठी सरासरी २०-३० टक्के कमी वेतन मिळते. ही विषमता दूर करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे. शासनाच्या योजनांचा विचार केला तर भारतात रोजगार हमी योजना, अन्न सुरक्षा योजना, आरोग्य विमा योजना यांसारख्या उपक्रमांमुळे काही प्रमाणात दिलासा मिळतो. परंतु या योजना अनेकदा तात्पुरता आधार देतात; दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करत नाहीत. भूमिहीन शेतमजुरांचे विश्व हे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या वेगळे आहे. त्यांचे जीवन स्थलांतर, अनिश्चितता आणि संघर्ष याभोवती फिरते. शिक्षणाची कमतरता, आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक उपेक्षा यामुळे त्यांचे सशक्तीकरण मर्यादित राहते. तरीही त्यांच्या श्रमावर संपूर्ण कृषीव्यवस्था उभी आहे.

शेतमजूरांना “कामगार” म्हणून मान्यता देणे म्हणजे केवळ संज्ञेचा बदल नाही, तर सामाजिक न्यायाच्या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे. जर ही मान्यता मिळाली, तर त्यांना किमान वेतनाची हमी, सुरक्षित कामाचे वातावरण, सामाजिक सुरक्षा आणि संघटन करण्याचा अधिकार मिळू शकतो. यामुळे त्यांच्या जीवनमानात गुणात्मक बदल घडू शकतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विषमता कमी करण्यासाठीही हा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र या प्रक्रियेत काही व्यावहारिक अडचणीही आहेत. शेतीचे स्वरूप हंगामी आहे; पावसावर आणि निसर्गावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. अनेक शेतकरी स्वतःच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे ते नियमित वेतन देण्याच्या स्थितीत नसतात. नियोक्ता आणि कामगार यांच्यातील संबंधही स्पष्ट नसतात. कधी मजूर दिवसावर काम करतो, कधी ठेक्यावर, तर कधी नातेसंबंधांच्या आधारावर. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील नियम थेट शेतीत लागू करणे कठीण ठरते. पण याचा अर्थ असा नाही की शेतमजुरांना हक्क नाकारले जावेत; उलट त्यांच्या परिस्थितीला अनुरूप अशी स्वतंत्र धोरणात्मक चौकट तयार करणे गरजेचे आहे.

शेवटी, ‘श्रमिक’ हा शब्द केवळ आर्थिक भूमिका दर्शवत नाही; तो मानवी सन्मानाचा प्रतीक आहे. संघटित आणि असंघटित यामधील दरी कमी करणे, भूमिहीन शेतमजुरांना न्याय देणे आणि जागतिक स्तरावरील चांगल्या पद्धतींचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे.

कारण शेवटी, श्रमिकांचे हात हे केवळ उत्पादनाचे साधन नाहीत. ते समाजाच्या भविष्याची पायाभरणी करणारे हात आहेत. आणि त्या हातांना सुरक्षितता, सन्मान आणि हक्क मिळाले, तरच खऱ्या अर्थाने श्रमिक दिनाची भावना साकार होईल.



**सुनील भारोडकर , नाशिक**






## पवार आडनावाच्या नातवंडांविरुद्ध कधीच लढणार नाही : गरज पडल्यास दुसरा मतदारसंघ निवडेन, सुप्रिया सुळे



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेत विविध राजकीय मुद्द्यांवर आपली भूमिका मांडताना स्पष्ट केले की, महाविकास आघाडी ही प्रामुख्याने संविधान वाचवण्यासाठी एकत्र आली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवर भाष्य करताना त्यांनी आघाडीची एकजूट अधोरेखित केली. तसेच, बारामतीमध्ये गोविंदराव आणि शारदाबाई पवार यांची पवार आडनाव असलेली जी नातवंडे आहेत, त्यांच्या विरोधात आपण कधीही निवडणूक लढवणार नाही, या आपल्या विधानाचा त्यांनी पुन्हा एकदा ठामपणे पुनरुच्चार केला आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, माझे काल रात्रीच उद्धव ठाकरे यांच्याशी बोलणे झाले होते. उद्धव ठाकरे यांचा काल शरद पवार यांना फोन आला होता. जयंत पाटील यांच्याशी देखील बोलणे झाले होते आणि कालच आम्हाला हे कळले. मी सुद्धा काल कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशी बोलले होते. आता एका मताने महाविकास आघाडीच्या वतीने अंबादास दानवे विधानपरिषदेवर जात आहेत.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, खरेतर शिवसेना आणि कॉंग्रेसच्या नेत्यांची चर्चा चालली होती. हर्षवर्धन सपकाळ मघाशीच सविस्तर बोलले आहेत. आता वेगळे काय बोलायची गरज वाटत नाही. मी असे काही बघत नाही, पवार साहेबांची देखील बिनविरोध निवडणूक झाली. भाजपने बिनविरोध का दिला? शिंदेंच्या शिवसेनेने बिनविरोध का दिला? असा सवालही सुळे यांनी उपस्थित केला.


महाविकास आघाडी एका विश्वासाच्या प्रेमाच्या नात्याने संविधान वाचवण्यासाठी एकत्रित आलेली आहे. समंजस पद्धतीने तिन्ही पक्ष महाराष्ट्राच्या हितासाठी आणि देशाच्या हितासाठी काम करत आहेत, त्यामुळे ताटातले वाटीत आणि वाटीतले ताटात त्यापेक्षा जास्त काही नाही, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ मे २०२६


# मानवी प्रज्ञा, जिज्ञासा आणि विचारक्षमतेला चालना देणारा बौद्ध धम्म



डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेने विषमताग्रस्त हिंदू धर्म व्यवस्थेला नाकारून सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात आमूलाग्र बदल केला. ज्यांना माणुसकीचे हक्क नाकारण्यात आले होते त्यांना वैज्ञानिक युगाकडे घेऊन जाण्याचे काम बाबासाहेबांनी केले. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजाचा आज मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. सामाजिक आणि राजकीय भान त्याच्यात आले आहे. सामाजिक गुलामगिरीची मानसिकता बदलून तो आता नव्या युगाकडे मार्गक्रमण करू लागला आहे. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून साऱ्या जगाला दाखवून दिले आहे की हा धर्म विकासाकडे, प्रगतीकडे जाऊ शकतो. हा धर्म नसून तो धम्म आहे. धम्म हा आचरण विषयक नियमांनी बांधल्या गेलेला असतो. बौद्ध धम्मात कर्मकांडांला, बुवाबाजीला, शोषणाला अजिबात महत्त्व नाही. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्य बौद्ध धम्माची आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या 22 प्रतिज्ञानुसार पूर्वीच्या अस्पृश्य समाजाने आपले वर्तन आणि आचरण ठेवले. जुन्या विषमताग्रस्त चालीरीती, रूढी, परंपरा बाजूला ठेवून वैज्ञानिक विचाराचा त्याने आग्रह धरला. ज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला ते फार पुढे गेलेत. ज्यांनी पारंपरिक मूल्यांचा स्वीकार केला ते आहे त्याच ठिकाणी राहिले. बाबासाहेबांनी दिलेल्या 22 प्रतिज्ञा ह्या खऱ्या अर्थाने जीवनाला प्रगतीपथाकडे घेऊन जाणाऱ्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना येथील प्रस्थापित समाजव्यवस्थेने प्रचंड छळले होते. निसर्गाने दिलेले माणुसकीचे हक्क त्यांचे हिरावले होते. बाबासाहेबांनी स्वतः हे अनुभवले होते. ते ज्या समाजातून आले त्या समाजालाही हिंदू धर्म व्यवस्थेच्या यातना भोगाव्या लागल्या. बाबासाहेबांनी ज्ञान संपादन करून या समाजाला बाहेर काढले. गौतम बुद्धांनी विषमताग्रस्त पारंपरिक विचारप्रणालीला नाकारले होते. बुद्धाचे हेच सामाजिक परिवर्तनाचे सूत्र बाबासाहेबांनी स्वीकारले. बुद्धाला जसा माणूस मुक्त करायचा होता तशाच प्रकारे बाबासाहेबांना सुद्धा येथील विषम समाज व्यवस्थेमधून आपल्या समाजाला बाहेर काढायचे होते. हे सर्व प्रयत्न त्यांनी केले. येथील प्रस्थापित व्यवस्थेला त्यांनी आमुलाग्र बदलायचा प्रयत्न केला. मात्र या व्यवस्थेने नेहमीच त्यांचा तिरस्कार केला. आज विचार करता असे लक्षात येते की, बाबासाहेबांनी या समाजाला विषमव्यवस्थेमधून बाहेर काढले नसते तर आज परिस्थिती कशी असती?

हिंदू धर्म व्यवस्थेने व्यक्तीला आत्ममग्न करून टाकले होते. त्यापलीकडे बघायलाच तो तयार नव्हता. या पारंपरिक चौकटीमधून बाहेर निघण्याचा मार्ग त्यांनी शोधला. सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या सर्वांचा अवलंब करणाऱ्या व्यवस्थेचा मार्ग त्यांनी स्वीकारला. हा मार्ग त्यांना फक्त बुद्धाने दाखविलेल्या विचारसरणीत दिसून आला. बौद्ध धर्म हा माणसाचा सन्मान करणारा धर्म आहे. सामाजिक संवेदनशीलता जपणारा धर्म आहे. हा धर्म वैज्ञानिक विचारप्रणालीकडे घेऊन जाणारा धर्म आहे. विश्वबंधुत्वाची भावना जोपासणारा धर्म आहे. वर्तमान युगांत याच विचारसरणीची मोठ्या प्रमाणात समाजाला गरज आहे. आज आपण बघतो समाजात मोठ्या प्रमाणात दुभंगलेपण दिसून येते. विज्ञानाने मोठी क्रांती केली. माणूस चंद्रावर पोहोचला. आज तर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या काळात मानवाने मोठीच प्रगती केली आहे. मात्र तंत्रज्ञानाची प्रगती ही खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती ठरू शकत नाही. वरपांगी बदल मोठ्या प्रमाणात झालेत मात्र माणूस स्वतःमधील संवेदनशीलता हरवून बसला आहे. नको तितके सामाजिक प्रश्न आज वाढले आहे. तंत्रज्ञानामुळे ही सामाजिक संबंध घट्ट होण्याऐवजी दुभंगलेपण समाजात निर्माण होत आहे. विज्ञानाच्या आधारे माणूस माणसाचे शोषण करू लागला आहे. तंत्रशास्त्रीय बदल हे खऱ्या अर्थाने समाजात आमुलाग्र बदल घडून आणणारे हवेत मात्र माणूस हा संस्कारहीन बनल्यामुळे त्याच्यातील विकृती मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहे. वर्तमान समाजात कल्पनेच्या बाहेरचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. परस्परांमधील विश्वास नष्ट झालेला दिसून येतो. व्यक्तीमधील स्वार्थी भावना वाढलेली दिसून येते. अहंकार वाढलेला दिसून येतो. लालसा प्रचंड वाढलेली दिसून येते. मात्र माणूस माणसावर प्रेम करण्या ऐवजी द्वेष करू लागला आहे.

**धर्माची चिकित्सा झाली पाहिजे**

धर्म हा माणसाच्या कल्याणासाठी असला पाहिजे हा विचार बाबासाहेबांचा होता. अज्ञान, अंधश्रद्धा, गुलामगिरी, कर्मकांड, शोषण यासारख्या मानवी हक्क हिरावून घेणाऱ्या प्रथा, परंपरा धर्म व्यवस्थेमध्ये नको. धर्म व्यवस्थेने माणसाचा सन्मान केला पाहिजे. धर्म व्यवस्थेने माणसाचे आचरण सुधारले पाहिजे. मात्र आज कर्मकांडाला मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झाल्यामुळे समाज दैववादी बनला आहे. दैववादी कर्मकांडी समाज प्रगतीपथाकडे जाऊ शकत नाही. आपल्या प्रश्नांची उत्तरे ही विज्ञानवादातच आपणाला मिळतील. त्यासाठी वैज्ञानिक विचारप्रणालीचा स्वीकार आपण करणे गरजेचे आहे. बाबासाहेबांनी येथील सर्वच धर्म संस्थांचा सखोल अभ्यास केला होता. धर्मसंस्थेची त्यांनी परखड समीक्षाही केली. मानवी मूल्यांचा स्वीकार करणारे आचरण आपण करायला हवे. हे आचरण विषयक मूल्ये धर्म व्यवस्था शिकवते. म्हणून धर्माची चिकित्सा झाली पाहिजे. कुणी सांगतो म्हणून एखादा विचार आपण स्वीकारायला नको. तो विचार खऱ्या अर्थाने वैज्ञानिक विचार प्रणालीवर आधारलेला असायला हवा. माणसाच्या प्रत्येक कृतीत वैज्ञानिक विचारसरणीचा अवलंब झाला पाहिजे. आज साऱ्या जगाने जी प्रगती केली ती विज्ञानाच्या सहाय्यानेच केली आहे. धर्म खऱ्या अर्थाने माणसाला नीतीचे आचरण करायला लावतो. नीती शिकविण्याचे काम धर्म व्यवस्था करते, मात्र ही नीती सम्यक विचारावर आधारलेली हवी.

बाबासाहेबांची सारे शिक्षण पाश्चात्य देशात झाले असल्यामुळे त्यांच्यावर वैज्ञानिक विचारप्रणालीचा मोठा प्रभाव पडला. त्यांनी ज्या विचारवंताचा अभ्यास केला त्यांचेही विचार याच पठडीतले होते. बुद्धाचा विचार, छत्रपती शिवाजी महाराजांचा कल्याणकारी राज्याचा विचार, गाडगे बाबांचा विचार, महात्मा ज्योतिराव फुले यांचा विचार, कर्मवीर भाऊराव पाटलांचा विचार, राजर्षी शाहू महाराज याचबरोबर कितीतरी समाज सुधारकांच्या विचारांचा प्रभाव बाबासाहेबांवर झाला. व याचे प्रतिबिंब आपल्या भारतीय राज्यघटनेमध्ये सुद्धा पडले आहे. पारंपरिक धर्म संकल्पना बाबासाहेबांना मान्य नव्हत्या. कोणताही धर्म हा वैज्ञानिक कसोट्यांच्या आधारावर टिकला पाहिजे. सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्तता धर्म व्यवस्थेने केली पाहिजे. व्यक्तीच्या वर्तनाला त्याने वळण लावले पाहिजे. आदर्श युक्त अशा पद्धतीचे वर्तन त्याने सामाजिक व्यवहार करताना करायला हवे. बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथात बाबासाहेबांनी वैज्ञानिक कसोट्यांवर आधारलेला बौद्ध धम्म सांगितला आहे.

**गुलामगिरीचे तत्त्वज्ञान बौद्ध धम्म नाकारतो**

एखादी गोष्ट स्वीकारत असताना आपण त्याचा सारासार विचार करायला हवा. आपल्या मधील वैज्ञानिक दृष्टी आपण विकसित करायला हवी. हीच दृष्टी आपल्याला आपले जीवन उज्वल बनवते. त्यांनी पारंपरिक बौद्ध धम्म बाजूला ठेवून वैज्ञानिक कसोट्यांवर आधारलेला बौद्ध धम्म स्वीकारला. बौद्ध धर्मात नीतीला मोठे महत्त्व आहे. नीती विषयक आचरण यावरच खऱ्या अर्थाने व्यक्तीची ओळख अवलंबून असते. अशा विचारसरणीचा अवलंब करणाऱ्या व्यक्ती खऱ्या अर्थाने समाजाचे हित साधणाऱ्या असतात. समाजात हीत म्हणजेच देशाचे हित. बुद्धाचा मार्ग हा कल्याणाचा मार्ग आहे. स्वतःचे हित त्याचबरोबर समाजाचे आणि देशाचे हित साधणारा हा मार्ग आहे. गुलामगिरीचे तत्त्वज्ञान बौद्ध धम्म नाकारतो. माणूस हा खऱ्या अर्थाने पारंपारिक सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त झाला पाहिजे. तरच त्याच्या जगण्याला अर्थ आहे. माणूस हा सन्मानाने एक जगायला हवा. तशी व्यवस्था त्याने निर्माण केली पाहिजे. अशा व्यवस्थेमध्ये सारा समाज प्रगतीपथाकडे जातो.

आधुनिक लोकशाहीला पोषक असणारी सामाजिक सांस्कृतिक मूल्य ही बौद्ध धम्मात दिसून येतात. धार्मिक कर्मकांडापासून दूर राहून विज्ञान आणि नीती तत्व याचा आपण स्वीकार केला पाहिजे असे बाबासाहेबांना वाटायचे. धर्म हा माणसा माणसाला जोडणारा हवा. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्य बुद्धाने सांगितलेल्या धर्माच्या तत्त्वज्ञानात आहे. बौद्ध धर्म हा माणसाचा सन्मान करतो. परिवर्तनाचा स्वीकार करतो वैज्ञानिक विचारप्रणालीचा स्वीकार करतो. पारंपरिक विषमताग्रस्त समाज व्यवस्थेमध्ये असलेल्या दलित अस्पृश्य समाजाला बाबासाहेबांनी वैज्ञानिक विचारसरणीचा बौद्ध धम्म दिला. हाच धम्म तुमच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल हे त्यांनी सांगितले. आपले आचरण त्यासाठी आपण बदलले पाहिजे. बाबासाहेबांनी याला धम्मचक्रअनुप्रवर्तन असे म्हटले आहे.

वैज्ञानिक विचाराचा स्वीकार, मानवी भावभावनांचा आदर, स्वातंत्र्य समता बंधुत्वाचा स्वीकार ही मूल्यतत्वे बौद्ध धम्माची आहे. आपण धर्मासाठी नाही धर्म आपल्यासाठी आहे. धर्मातून समाजाची कल्याण झाले पाहिजे. धर्माची सामाजिक कल्याणाच्या दृष्टिकोनातून चिकित्सा झाली पाहिजे. ईश्वरावर विश्वास ठेवणारा धर्म नको. माणुसकीवर विश्वास ठेवणारा धर्म हवा. विज्ञान निष्ठा त्यामध्ये असायला हवी. माणसा माणसातील व्यवहार हे समतेची असायला हवे. तर्क आणि बुद्धीच्या कसोटीवर धर्माची पारख झाली पाहिजे. धर्माची ही चिकित्सा झाली पाहिजे हा विचार बाबासाहेबांचा होता.

**बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय**

बौद्ध धर्मात व्यक्तीच्या सामाजिक व्यवहाराला महत्त्व होते. नैतिक आचरणाला महत्त्व होते. गुलामी मानसिकता बाजुला सारून सामाजिक बंधुत्वाचे नाते त्याने जपायला हवे. जो धर्म अशा पद्धतीचे विचार सांगतो त्याच धर्माचे आपण पालन करावे. हा धर्म बौद्ध धर्म असून त्यातील मूल्य संस्कार हे माणसाच्या प्रगतीला चालना देणारे आहेत. बौद्ध धम्मानुसार आचरण करणे हे खरंतर कठीण काम आहे. मात्र प्रयत्न करायला हरकत नाही. हे आचरण कोणीही करू शकते आणि स्वतःला प्रगतीपथाकडे नेऊ शकते. आज बाहेरच्या देशात आपल्या देशाची ओळख ही बौद्ध धर्माच्या अनुषंगाने करून दिल्या जाते. बुद्धाला सामाजिक कल्याणाचा मार्ग हा साऱ्या जगाला सामाजिक समतेकडे घेऊन जाणारा मार्ग आहे. वर्तमान गुंतागुंतीच्या आणि संघर्षाच्या काळात बौद्ध धम्माची विचारसरणीच खऱ्या अर्थाने साऱ्या जगाला एका सूत्रात बांधण्याचे कार्य करेल.

वर्तमानात एवढी प्रगती झाली असली तरी माणूस हिंसा करू लागला आहे. त्याचा स्वार्थ वाढला आहे. त्याचा अहंकार वाढला आहे. यापासून दूर राहण्यासाठी खऱ्या अर्थाने बौद्ध विचारप्रणालीची गरज आहे. बहुजन हिताय बहुजन सुखाय लोकानुकंपाय.... अशा विचारसरणीचा हा धम्म आहे. आजच्या या स्पर्धात्मक युगात मानवी सुख दुरापास्त झाले आहे अशा या पार्श्वभूमीवर बुद्धाचा समाज कल्याणकारी विचार खऱ्या अर्थाने साऱ्या जगाला मार्ग दाखवेल. बुद्धाची अहिंसा साऱ्या जगाला मार्ग दाखवेल. मानवी प्रज्ञेला, जिज्ञासेला आणि विचारक्षमतेला चालना देणारा हा धम्म आहे. कारणमीमांसा करणारा हा धम्म आहे. इहलौकीक जीवनाला व मानवी मूल्यांना महत्त्व देणारा हा अनिश्वरवादी धर्म आहे. विवेक आणि तर्काला येथे महत्त्व आहे. माझ्या बुद्धीला जे पटेल तेच मी घेणार. जे पटणार नाही ते मी सोडून देणार अशी विचारसरणी देणारा हा धम्म आहे. बाबासाहेबांनी सातत्याने धर्म चिकित्सा केली. कोणतीही धर्मचिकित्साही खऱ्या अर्थानं समाजाला पुढे घेऊन जाते.

**बुद्धाची स्त्री मुक्तीविषयक भूमिका**

बुद्धाचा स्त्री विषयक दृष्टीकोन हा संमिश्र असा होता तरीही तत्कालीन समाजाचा विचार करता तुलनात्मकदृष्ट्या तो उदार होता असे दिसते. प्रारंभी बुध्द स्त्रीयांना भिक्षू संघात प्रवेश द्यायला तयार नव्हते. शिष्य आनंदाच्या आग्रहावरून बुध्दाने स्त्रियांना प्रवेश द्यायचे कबुल केले. अनेक स्त्रिया कौटुंबिक जाचातून बाहेर पडण्यासाठी भिक्षुणी बनल्या जगाच्या इतिहासात सर्वप्रथम स्त्रियांना समानतेची वागणूक देण्याचा प्रयत्न सिध्दार्थ गौतम बुध्दाने केला. जगात दुःख आहे पण हे दुःख अधिकाधिक स्त्रियांच्याच वाट्याला आले म्हणून ज्या काळात स्त्रिला सन्यास घेण्यापासून दूर ठेवण्यात आले त्या काळात प्रवज्या घेण्याचा हक्क स्त्रियांना देऊन त्यांना पुरुषांच्या बरोबरीने आणले नाही तर पुरुषापेक्षा श्रेष्ठ मानले आहे. समाजात स्त्रिला सन्मान आणि प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून दिले म्हणून स्त्री मुक्तीचे आद्यप्रणेते म्हणून हे ठरतात.

स्त्रियांना भिक्षुणी संघ स्थापन करण्याचे अधिकार दिले त्यामुळे स्त्रियांना ज्ञानार्जन करणे आणि आपल्यात असलेल्या सुप्त अवस्थेतील आध्यात्मिक तेजाची ओळख किंवा जाणीव करून देणे जेणेकरून स्त्रियांची पारंपरिक गुलामगिरीतून सुटका होऊन आत्मसंशोधनाची, स्वयंतेजाची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली. बुध्दकाळात क्षेमा, महाप्रजापतीगोतमी, यशोधरा, कुंडलकेशा, पटाचारा, विशाखा, आम्रपाली, धम्मदिना, सोमा, उत्पलवर्णा, इत्यादी स्त्रिया इतिहासात प्रसिध्द झाल्या आहेत. आपल्या पूर्वायुष्यातील दैनंदिन जीवनात आलेले बाह्यविश्वाचे आणि आपल्या अंतरंगातील अनुभव भावनापूर्ण अशा शैलीत चितारण्याचा त्यांनी थेरीगाथेमध्ये प्रयत्न केला आहे. ही थेरीगाथा म्हणजे स्त्री मुक्तीची गाथाच आहे. यामध्ये 73 बौध्दभिक्षूणीचे आत्मकथन आहे. वैदिक काळात गार्गी, मैत्रयी, सुलभा आदी विव्दान स्त्रियांचा उल्लेख येतो पण त्या संख्येने अत्यंत कमी होत्या. सर्वसाधारण समाजातील स्त्रियांचे जीवन फार काही उंचावले नव्हते, न स्त्री स्वातंत्र्यमर्हति अत्ता तो काळ होता, असे जरी असलेतरी बुध्दकालीन स्त्रियांचे विविध क्षेत्रातील स्थान/प्रतिष्ठा यांचा उल्लेख येतो. हिंदू धर्मातील अन्याय, विषमता, स्त्री विरोधी समाज रचनेला कंटाळून अनेक स्त्रिया बौध्दधम्माकडे आकर्षित झाल्या.

बुध्दाने स्त्री-शूद्रांचं स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि अस्तित्व नाकारणाऱ्या तत्वज्ञानाला सुरुंग लावला. बहुजनाच्या हिताची, सुखाची त्यांनी प्रतिज्ञा केली. दास्यमुक्तीचा मार्ग त्याने दाखविला. प्रसेनजीत राजा स्वतःला कन्या प्राप्त झाल्याचे ऐकून दुःखी झाला हे बुध्दाला कळले त्यावेळी त्यांनी काही स्त्रिया पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असू शकतात, स्त्री बुध्दिमान, शीलवान असून कुटूंबासाठी तिचे कर्तव्य आणि तिच्याकडून होणारे मुलांवरील संस्कार यामुळे ती कर्तृत्वान असतेच शिवाय त्याच स्त्रीपोटी महान, शूर, कर्तृत्ववान, महापुरुष जन्माला येतात. त्यामुळे ती सासर आणि माहेर या दोन्ही कुळाचा तसेच देशाचा उध्दार करू शकते असे बुध्दाने राजा प्रसेनजीताला पटवून दिले. पुरुषाचा सर्वात मोठा मित्र त्याची पत्नी आहे. स्त्रीवर अन्याय, अत्याचार झाला नाही तर समाज समृध्द होईल. समाजाची अवनती होणार नाही म्हणून स्त्रीचे पावित्र्य राखले पाहिजे, हे त्यांनी लोकांना पटवून दिले. स्त्रीच्या दुःखाची जाणीव त्यांनी समाजाला करून दिली. स्त्रीचे नैसर्गीक जीवन तिचे स्त्रीत्व तिच्या विकासा आड येऊ शकत नाही. फक्त तिला संधी मिळाली पाहिजे. अशा प्रकारे स्त्रियांमधील मानसिक दास्य आणि न्यूनगंडाची भावना बुध्दाने दूर करण्याचा प्रयत्न केला. बौध्दधम्मात अनुयायाना पंचशीलाचे पालन करावे लागते. स्त्रियांना या ऐवजी दुसरे कोणतेच व्रतवैकल्य किंवा नवऱ्यासाठी उपासतापास करण्याची गरज नाही.

वर्तमान काळात बौद्ध धर्माची नीती तत्वे याचे पालन समाजात फारसे होताना दिसून येत नाही. बौद्ध धम्माच्या अनुयायी मंडळींनी कर्मकांड, प्रतिकामध्ये यासारख्या बाबींमध्ये अडकता कामा नये. आपल्या आचरणाने आपण ओळखल्या गेलो पाहिजे. आपल्या जबाबदाऱ्या गंभीरपणे बजावल्या पाहिजे. सामाजिक समतेचे आणि सौहार्दाचे वातावरण टिकवले पाहिजे. काळानुरूप स्वतः बदल केला पाहिजे. भविष्यातील आव्हानाचा विचार केला पाहिजे. त्यासाठी एकमेकांना समजावून घेऊन, प्रोत्साहन देऊन पुढे जाण्याचा आपण मार्ग स्वीकारावा. मैत्री भावना आपण वाढवावी. समाजाच्या भल्याचा विचार करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा स्वीकार हा उगाचच केला नाही. त्यासाठी अधिकाधिक ज्ञान संपादन करून स्वतःसह आपल्या समाजाचा उद्धार करण्यासाठी आपण झटले पाहिजे. भारतीय राज्यघटनेमध्ये बौद्ध धम्माची तत्वे स्वीकारली आहेत. ही तत्वे समाजाला एकत्र बांधण्याचा प्रयत्न करतात. अलीकडे नको तितका परस्पर विसंवाद आणि संशय वाढला आहे. माणूस माणसापासून दूर होणे हा समाजासाठी, देशासाठी मोठा धोका आहे. निकोप समाजाच्या निर्मितीसाठी बौद्ध धम्माची मूलतत्त्वे महत्त्वपूर्ण आहे. ती आपण आचरणात आणण्याचा संकल्प करू या.




**प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**समाजशास्त्र विभाग**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना.**